हजारो जन्मदाखले बोगस

मुंबई महापालिकेत दहा हजारांहून अधिक खोटी प्रमाणपत्रे उघड

सुशांत मोरे
Sushant.more@timesofindia.com

- आवश्यक कागदपत्रांविनाच प्रमाणपत्रे जारी
- आणखी दाखल्यांची पालिकेकडून पडताळणी
- रद्द करण्यासाठी पुढील आठवड्यात प्रस्ताव

मोठा घोटाळा असल्याचा आरोप

मुंबई : खोट्या कागदपत्रांच्या आधारे ८७ हजार ३४७ बनावट जन्म प्रमाणपत्रे तयार करण्यात आल्याचा आरोप झाल्यानंतर मुंबई महापालिकेकडून त्याची सखोल पडताळणी करण्यात येत आहे. आत्तापर्यंत दहा हजारांपेक्षा जास्त जन्म प्रमाणपत्रे बनावट आढळली आहेत.

ही प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी पुरावे म्हणून लागणारी कागदपत्रेच उपलब्ध नाहीत, असे उघडकीस आले आहे. त्या-त्या वॉर्डस्तरावर संबंधित विभागांकडेही कागदपत्रे सादर झालेली नाहीत. पुरावे म्हणून लागणारी कागदपत्रे नसूनही प्रमाणपत्र तयार करण्यात आल्याने आता ही प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी मुंबई महापालिकेकडून राज्य सरकारकडे पुढील आठवड्यात प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेच्या २६ वॉर्डमधून एकूण ८७ हजार ३४७ अवैध जन्म प्रमाणपत्रे जारी झाल्याचा आरोप भाजप नेते किरिट सोमय्या यांनी केला होता. या प्रकरणात मुंबई महापालिकेच्या सर्व २६ वॉर्डमधून बंद झालेल्या 'सॅप' प्रणालीच्या 'सीएसआर' प्रणालीच्या अंतर्गत ८७ हजार ३४७ जन्म प्रमाणपत्रे देण्यात आली. २०२४ आणि २०२५ मध्ये एका बाजूला 'सॅप' प्रणालीच्या अंतर्गत जन्म नोंदी, सुधारणांच्या नावाने नवीन जन्म प्रमाणपत्र देण्यात येत होते. त्याच वेळी नवीन 'सीएसआर' पोर्टलच्या अंतर्गत ३३ हजार ७७२ नोंदीही करण्यात आल्या. एकाच वेळी जुनी बंद पडलेली 'सॅप' प्रणाली तसेच नवीन 'सीएसआर' पोर्टलच्या अंतर्गत नोंदी म्हणजे एक मोठा घोटाळाच आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचा आरोप भाजप नेते सोमय्या यांनी केला होता. ५ मे २०२६ रोजी यासंदर्भात मुंबई महापालिका मुख्यालयात महापौर रितू तावडे आणि सोमय्या यांनी पत्रकार परिषद घेऊन चौकशीची मागणी केली होती.

बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. महापौर, महापालिका आयुक्तांनी याची दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी मागणी सोमय्या यांनी मध्यंतरी केली होती. त्यानंतर ई-वॉर्ड, एल-वॉर्ड, भायखळा, गोवंडी आणि देवनार परिसरात मोठ्या प्रमाणावर अशी प्रमाणपत्रे दिल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणाची गांभीर्याची दखल घेत महापौर रितू तावडे यांनी आरोग्य विभागातील काही जुन्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करून नव्या नियुक्त्या करण्याचे निर्देश दिले. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून ८७ हजार ३४७ जन्म प्रमाणपत्रांची पुन्हा पडताळणी करताना महापालिकेला आत्तापर्यंत दहा हजारपेक्षा जास्त प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जन्म प्रमाणपत्रासाठी लागणाऱ्या आधार कार्डसह अन्य कागदपत्रेच या जन्म प्रमाणपत्रासोबत नाहीत. त्यामुळे कागदपत्रांशिवाय ही प्रमाणपत्रे तयार झालीच कशी, ही कागदपत्रे गहाळ झाली की जोडण्यात आलेली नाहीत, असा प्रश्न आता महापालिका अधिकाऱ्यांना पडला आहे. कागदपत्रांशिवाय आढळलेली दहा हजारांपेक्षा जास्त जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य सरकारच्या रजिस्ट्रार जनरलकडे ही प्रमाणपत्रे रद्द करण्याचा प्रस्ताव महापालिकेकडून पाठवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

यासंदर्भात मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांच्याशी वारंवार संपर्क साधूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

काशिमिरामध्ये भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

घोडबंदरकडून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या एका चारचाकी वाहनाने विरुद्ध दिशेने येणाऱ्या कंटेनरला बुधवारी रात्री जोरदार धडक दिली. काशिमिरा पुलावर घडलेल्या या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे.

मिरा रोड परिसरातील म्हाडा इमारतीत राहणारा २३ वर्षीय गोपाल भारवाड हा आपल्या चार मित्रांसोबत चारचाकी वाहनातून फिरण्यासाठी बाहेर पडला होता. घोडबंदरकडून मुंबईच्या दिशेने जात असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार काशिमिरा पुलावरील डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेच्या मार्गिकेत गेली आणि समोरून येणाऱ्या कंटेनरला जोरदार धडकली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या गोपाल भारवाड याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

जाब विचारल्याने तरुणाला मारहाण

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

रस्त्याने जाताना जोरात धक्का लागल्याचा जाब विचारल्याने एका तरुणाला बुधवारी बेदम मारहाण करण्यात आल्याचा प्रकार भाईंदरमध्ये घडला आहे. यात दिनेशकुमार राजभर हा ३१ वर्षीय तरुण जखमी झाला आहे. या प्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेला जय अंबेनगरमध्ये दिनेशकुमार राहत असून तो मजुरीचे काम करतो. एका वृद्ध महिलेची खाद्यपदार्थाचे हातगाडी धक्का मारून घरी नेण्यासाठी तो बुधवारी रात्री मदत करत होता. यावेळी बाजूने जाणाऱ्या शिवम या तरुणाची त्याला धडक बसली. यावेळी शिवमच्या हातातील प्लास्टिकचे कॅरेट दिनेश कुमारच्या पायाला जोरात लागले. त्यामुळे त्याने शिवमला जाब विचारला. याचा मनात राग धरून शिवम व त्याच्यासोबत असणाऱ्या एका तरुणाने दिनेशकुमारला बेदम मारहाण केली. यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत पोचली आहे. या प्रकरणी शिवमसह त्याच्या सहकारी तरुणाविरोधात भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोन ॲपवरून खंडणी; सहा अटकेत

मुंबई : लोन ॲपवरून झटपट कर्ज देऊन ते फेडूनही कर्जदारांचा वेगवेगळ्या प्रकारे छळ करणाऱ्या टोळीचा मुंबई गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. पोलिसांनी या टोळीतील सहा जणांना अटक केली असून, ही टोळी बदनामी आणि आर्थिक छळवणूक करून खंडणी वसूल करीत होती. या टोळीचा मुख्य सूत्रधार आणि इतरांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

एका व्यक्तीने २५ मे रोजी एका ऑनलाइन लोन ॲपवरून २२,०५० रुपयांचे कर्ज घेतले होते. हे कर्ज त्यांनी व्याजासह परतफेड केल्यानंतरही मानसिक त्रास देऊन त्यांना विविध १८ ऑनलाइन लोन ॲपवरून ७,०५,५७० रुपये कर्ज घेण्यास भाग पाडले.

KUSUM TOURS स्वस्त, आणि मस्त!
नमस्कार कुसुम टूर्स आयोजित लेह लडाख ही सहल भारतातील सर्वात सर्वोत्कृष्ट अप्रतिम निसर्गाच्या वेग वेगळ्या रंग छटा असलेली सहल आहे, आयुष्यात एकदा तरी सर्व काही बाजूला ठेवून लेह लडाखला प्रथम प्राधान्य देऊन ही सहल करावी ही आग्रहाची विनंती!
बाकीच्या सहली ह्या नंतर ही करता येतील परंतु शांत महाकाय लेह लडाख हे निव्वळ जून, जुलै आणि ऑगस्टमध्येच अनुभवता येते. तेव्हा आत्ताच योग्य वेळ आहे डोळ्यांचे पारणे फेडणारी ही सहल त्वरित बुकिंग करा आणि हया अप्रतिम अश्या निसर्गाचा आनंद घ्या!

₹ 31,000/-* फक्त
Flight Charges Extra
3 जुलै ते 12 जुलै (10 दिवस)
प्रसंन्ना : 98674 07149 / 84529 15555 / 98213 45646
पूर्वी सांगू



Reliance Industries Limited
Growth is life

नोंदणीकृत कार्यालय: ३री मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५९५ ५०००• फैक्स: +९१-२२-२२०४ २२५८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

कंपनीच्या सदस्यांसाठी सूचना

एकोणचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) आणि ई-मतदानासंबंधी माहिती

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी लागू, परिपत्रकांची पूर्तता करण्यासाठी, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**"व्हीसी"**)/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (**"ओएव्हीएम"**) कंपनीची एकोणचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ पश्चात) (**"एजीएम"**) **शुक्रवार, ९ जून, २०२६ रोजी (भारतेळ) दुपारी २:०० वाजता** बोलाविणारी सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, व त्यासोबत संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडण्यात आलेले इतर दस्तऐवज, कंपनीच्या सदस्यांना दुरुस्तार, **२८ मे, २०२६** रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ज्यांनी कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**"केफिनटेक"**), कंपनीचे रजिस्ट्रार व हस्तांतरण एजंट/डिपॉझिटरी सहभागी/डिपॉझिटरीज यांकडे त्यांचे ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत अशा सदस्यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ या वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना पुरवला असलेल्या वेबलिंकचा अचूक पाच दंडाचे पत्र पाठविण्यात येत आहे. एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ या वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि स्टॉक एक्सचेंज म्हणजे बीएसई लिमिटेड (**"बीएसई"**) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (**"एनएसई"**) यांच्या वेबसाईटवर अनुक्रमे **www.bseindia.com** येथे आणि **www.nseindia.com** येथे व **केफिनटेक** यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध आहेत.

एजीएमची सूचना प्रसारित करण्यापूर्वी सायबेप्सपूर्व सर्व कामकाजाच्या दिवशी एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले दस्तऐवज सदस्यांच्या तपासणीसाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध आहेत. ज्या सदस्यांना सदर दस्तऐवज तपासून पहायचे असतील त्यांनी त्यांचा डिपा/त्यांचा फोलिओ क्रमांक/डीपी आयडी आणि क्लाएन्ट आयडी नमूद करून **rilagm@ril.com** येथे ई-मेल पाठवावे.

दुरुस्त ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदान:

कंपनी आपल्या सदस्यांना एजीएमच्या मंजूर करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (**"ई-मतदान"**) मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य येथे खाली नमूद करण्यात आलेल्या तारखांने दुरुस्त पद्धतीने मतदान कक्ष शकतील (**"दुरुस्त ई-मतदान"**). कंपनीने ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनटेक यांच्या सेवा घेतल्या आहेत.

डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात, छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी त्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविले नाहीत, अशा सदस्यांशांठी दुरुस्त मतदान पद्धतीने मतदान करयाबाह्र, मतदानाशी संबंधित माहिती आणि सूचना एजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत. (अ) एजीएमची सूचना पाठविण्यात आलयांनंतर कंपनीची सदस्य बनलेल्या आणि कट-ऑफ तारखेला (येथे नमूद करण्यात आली आहे) समभाग धारण करणारा व्यक्ती; (ब) दुरुस्त आयडी आणि पासवर्ड मिळवलेले सदस्य, यांनी कोणत्या पद्धतीने दुरुस्त आयडी आणि पासवर्ड मिळवावे/तयार/पुनर्जनरा करावे हे एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दुरुस्त ई-मतदान सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल:

दुरुस्त ई-मतदान सुरू होण्याची वेळ	:	**रविवार, दिनांक १४ जून, २०२६ रोजी भारतेळ दुपारी ०१:०० वाजता**
दुरुस्त ई-मतदान संपण्याची वेळ	:	**गुरुवार, दिनांक १८ जून, २०२६ रोजी भारतेळ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत**

वरील तारीख व वेळेनंतर दुरुस्त ई-मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि केफिनटेक द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर दुरुस्त ई-मतदान मॉड्यूल बंद करण्यात येईल.

ज्यांनी दुरुस्त ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे एजीएमला उपस्थित असलेले सदस्य एजीएमच्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान (**"इन्स्टा पोल"**) कक्ष शकतील.

शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६ रोजी अंतिम मुदतीच्या तारखेला डिपॉझिटरी यांनी देवलेल्या सदस्यांचे नभिसरंट/लाभधारक मालकांच्या रजिस्टर मधे ज्यांचे नाव नोंदविण्यात आले असेल अशी व्यक्तीच फक्त दुरुस्त ई-मतदान सुविधेचा लाभ घेऊ शकतील किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकतील आणि इन्स्टा पोलद्वारे मतदान कक्ष शकतील.

ई-मेलचा पत्ता नोंदवण्याची/सुधारता करण्याची पद्धती:

अ) प्रापित स्वरूपात समभाग धारण करताना सदस्यांना, ज्यांनी कंपनीकडे त्यांचा ई-मेल पत्याची नोंदणी/सुधारणा केली नाही त्यांनी आपलाकडे पूरक एजीएमसंबंधा योग प्रमाणे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आय्एसआर-१ (जे कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहे) केफिनटेक लिमिटेड म्हणजा इंडस्ट्रीज लिमिटेड यांना सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ और ३२, गचीबौली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२, येथे सादर करून त्यांच्या ई-मेल पत्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ब) ज्यांनी अचूक डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे त्यांच्या ई-मेल पत्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समगाध धारण करणाऱ्या सदस्यांना डिपॉझिटरी सहभागीकडे त्यांच्या ई-मेल पत्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदानासंबंधी काही शंका असल्यास, सदस्यांनी केफिनटेकची वेबसाईट: **https://evoting.kfintech.com** येथे ई-मतदानासाठी उपलब्ध असलेल्या ''डाऊनलोडस'' भागात हुंडाळून द्वारा उपलब्ध असलेला ''हेल्प'' आणि ''एफएक्यू'' भाग/ई-मतदान करण्याविषयी माहिती पुरवत पहावे.

ई-मतदानासंबंधी काही शंका असल्यास, सदस्यांनी खालील संपर्काच्या तपशीलची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:
श्री. वी. बालाजिश्मन, उपव्यवस्थ
केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सूचित: सिलनम्न इंडस्ट्रीज लिमिटेड
सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ और ३२, गचीबौली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट,
नानक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२
ई-मेल: **evoting.ril@kfintech.com**
टोल फ्री क्रमांक: १८०० ३४५ ४००१ (सर्व कामकाजाचे दिवशी सकाळी ९:०० (भारतेळ) ते सायंकाळी ६:०० (भारतेळ) पर्यंत)

व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमलाचे सहभागी होणे:

सदस्य जिओमिट द्वारा https://joevents.jio.com/rilagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉगइनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे त्यांचे सार्वजनी माहिती एजीएमच्या सूचनेत दिव क्र.९ मध्ये देण्यात आली आहे. ज्यांनी दुरुस्त ई-मतदान पद्धतीने मतदान केले आहे अशे सदस्य एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा एजीएमच्यो त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : २९ मे, २०२६

www.ril.com

Hawkins

हॉकिन्स कुकर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: मेकर टॉवर एफ 101, कफ परेड, मुंबई 400005.
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर: L28997MH1959PLC011304
फोन: 022-22186607
ho@hawkinscookers.com □ www.hawkinscookers.com

वित्तीय परिणामांचा गोषवारा

(रु. कोटी)

	संपलेली तिमाही		संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)	
	मार्च 2026	मार्च 2025	मार्च 2026	मार्च 2025
1) प्रचलनाद्वारे एकुण उत्पन्न/महसूल (सूट वजा जाता)	365.43	306.66	1252.93	1115.76
2) कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण मुद्दे पूर्व)	53.63	46.90	176.62	154.87
3) कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण मुद्दे पश्चात)	53.63	46.90	176.62	154.87
4) कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण मुद्दे पश्चात)	39.78	34.36	131.19	114.69
5) कालावधीसाठी एकुण सर्वसमावेशक मिळकत (कालावधीचा करपश्चात नफा आणि इतर सर्वसमावेशक करपश्चात मिळकत सह)	39.63	32.98	130.74	113.22
6) भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल	5.29	5.29	5.29	5.29
7) पुनर्मुल्यांकित राखीव निधी वगळता राखीव	439.96	377.96	439.96	377.96
8) प्रतिसमभाग मिळकत रूपयात (प्रत्येकी रू.10च्या समभागावर, बेसिक व डायल्युटेड)	75.22	64.97	248.10	216.90

टीपा: सेबी (लिस्टिंग ऑब्लिग्येशन्स व प्रकटिकरणाच्या आवश्यकता) अधिनियम, 2015 मधील नियम 33 सुधारित, अन्वये बीएसई लिमिटेड यांच्याकडे भारतीय लेखामानांका नुसार सादर करण्यात आलेल्या दिनांक 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही/वर्षाच्या तपशिलवार वित्तीय परिणामांचा गोषवारा देण्यात आला आहे. सदर तपशिलवार स्वरूपातील तिमाही/वर्षाचे वित्तीय परिणाम बीएसई लिमिटेड यांच्या वेबसाईटवर www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाईटवर www.hawkinscookers.com/Q426 येथे उपलब्ध आहेत (बाजूला क्यूआर कोड देण्यात आला आहे).

मुंबई
28 मे 2026

करिता हॉकिन्स कुकर्स लिमिटेड
सुदीप यादव, व्हाईस चेअरमन आणि चीफ फायनान्शियल ऑफिसर

स्वत:साठी आणि देशासाठी 55% गॅसची बचत करा

1. नविन हॉकिन्स BEE (बीईई) 4 स्टार मानांकन असणारी गॅसची शेगडी वापरा.
2. उघड्या भांड्यांऐवजी प्रेशर कुकरचा वापर करा.
3. कुकरची शिट्टी होताच गॅस मंद करा.
4. 3 लिटरपर्यंतच्या कुकर्ससाठी लहान बर्नरचा वापर करा.
5. डाळ आणि राजमा शिजवण्यापूर्वी भिजत घाला.
6. ज्योत आधीच बंद करा आणि अन्न नैसर्गिकरीत्या शिजू द्या.
7. कुकरमध्ये गळती आहे का ते तपासा, गॅस्केट कडक झाले असल्यास ते बदला.

तुमच्या हॉकिन्स कुकरमुळे, तुमचा गॅस दुप्पट काळ टिकू शकतो.

MORE STARS MORE SAVINGS
2026 - 28 Label Series
BEE 4 Star Rating

55% कसा वाचतो? 900 ग्रॅम तांदूळ आणि 350 ग्रॅम तुरीची डाळ शिजवण्यासाठी **लागणारा गॅस.**

उघडे भांडे	126 ग्रॅम
या 7 टप्प्यांचा वापर केल्यास	56 ग्रॅम
गॅसची बचत	70 ग्रॅम